# पाचशेहून अधिक वारकऱ्यांपर्यंत पोहोचला सायबर सुरक्षेचा संदेश

## मुक्ताईनगरात उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, २६ जुलै**

आषाढी एकादशीनिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सच्या क्विक हील सायबर वॉरियर क्लबतर्फे, क्विक हील फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर पोलीस यांच्यातर्फे मुक्ताईनगर येथील संत मुक्ताबाई मंदिरात सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. वारकरी परंपरा आणि आधुनिक डिजिटल सुरक्षेची सांगड घालत सादर करण्यात आलेल्या या उपक्रमाने उपस्थित वारकरी आणि भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. यातून पाचशेहून अधिक वारकऱ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचला.

या उपक्रमात स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सच्या २० सायबर वॉरियर्सनी उत्साहाने सहभाग घेतला. सर्व स्वयंसेवकांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान केली होती. यामध्ये एका विद्यार्थ्याने भगवान श्री विठ्ठल तर एका विद्यार्थिनीने माता रुक्मिणी यांची वेशभूषा साकारून वारकरी संप्रदायाचे आकर्षक दर्शन घडविले. 'सायबर वारकरी' ही अभिनव संकल्पना प्रत्यक्षात साकारत विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेचे संदेश देणारे पोस्टर्स, फलक आणि विशेष कॅप्सच्या माध्यमातून जनजागृती केली.



तीन वेगवेगळ्या पालख्यांसमोर विद्यार्थ्यांनी प्रभावी नृत्य आणि पथनाट्य सादर केले. या पथनाट्यामधून ऑनलाइन फसवणूक, बनावट लिंक, ओटीपी फसवणूक, बँकिंग आणि यूपीआय फसवणूक, सोशल मीडिया गैरवापर तसेच डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी याबाबत प्रभावी संदेश देण्यात आला. मनोरंजनातून प्रबोधन हा उद्देश ठेवून सादर करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला.

यावेळी उपस्थित वारकरी आणि भाविकांना 'सायबर सेफ कार्ड्स'चे वाटप करण्यात आले. या कार्ड्समध्ये सायबर सुरक्षेसंदर्भातील महत्त्वाच्या सूचना, खबरदारीचे उपाय आणि आपत्कालीन संपर्काची माहिती देण्यात आली होती. अनेक वारकऱ्यांनी ही माहिती जतन करून ठेवत विद्यार्थ्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. सायबर सुरक्षेवरील प्रश्नोत्तरे, छोटेखानी खेळ, संवादात्मक कृती आणि प्रत्यक्ष सहभागातून नागरिकांना सायबर सुरक्षिततेबाबत जागरूक करण्यात आले. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यामुळे संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण आणि आनंददायी बनले. विशेष म्हणजे, पारंपरिक वारकरी संस्कृती आणि आधुनिक सायबर सुरक्षेचा विषय यांची सांगड घालणारी ही संकल्पना अनेकांसाठी आकर्षणाचा विषय ठरली.